संक्षिप्त **फौ. ख. क्र. २९५/२०२३**
**सरकार -वि.- सचिन**
**नि.क्र. ०२**

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्र.१ यांची जबानी</u>**

**<u>मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,</u>**

माझे नाव - गणेश रामाजी भुरे,
वय ४७ वर्षे, व्यवसाय – पो.हे.कॉ. ब.क्र. १५८२,
राहणार – पोलीस अधिक्षक कार्यालय नागपूर जि. नागपूर.

**<u>सरतपासणी-सहायक सरकारी अभियोक्ता श्री व्ही.यु.मिरचे यांचे मार्फत</u>**

१. मी आरोपीला ओळखतो. तो आज कोर्टात हजर आहे. दिनांक १६.०५.२०२३ रोजी मी पोलीस स्टेशन, भिवापूर येथे पोलीस हवालदार म्हणून कार्यरत होतो. त्यादिवशी माझी नाईट अधिकारी म्हणून ड्यूटी होती. त्यादिवशी रात्री १०.०० ते १०.३० वाजताच्या दरम्यान खबर मिळाली की, मरु नदीच्या जवळ अपघात झाला आहे. मी घटनास्थळी गेलो असता तेथे जखमी पडलेले होते. मी जखमींना ग्रामीण रुग्नालय भिवापूर येथे पाठविले. त्यानंतर उपचार घेतल्यानंतर जखमींचे बयान नोंदविले. त्यानंतर घटनास्थळी गेलो दोन पंचांना समन्स दिला. आता मला दाखविलेला समन्स तोच आहे. त्यावर माझी व पंचांच्या सह्या आहेत. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.३** देण्यात येते. त्यानंतर घटनास्थळ पंचनामा तयार केला. आता मला दाखविलेला घटनास्थळ पंचनामा तोच आहे. त्यावर माझी व पंचांची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.४** देण्यात येते. त्यांनतर चौकशी अहवाल तयार केला. आता मला दाखविलेला चौकशी अहवाल तोच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.५** देण्यात येते. आता मला दाखविलेला छापील प्रथम खबर अहवाल तोच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.६** देण्यात येते. त्यानंतर जखमीच्या वैद्यकीय प्रमाणपत्राबाबत वैद्यकीय अधिका-याकडे तहरीकरीता पत्र दिले. आता मला दाखविलेले पत्र तेच आहे. त्यावर माझी सही आहे.

त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.७** देण्यात येते. त्यानंतर जखमींचे वैद्यकीय प्रमाणपत्र प्राप्त केले. पुढील तपास नागेश वाघाडे यांनी केला.

सरतपास संपला.

**<u>उलट तपास आरोपी तर्फे त्यांचे वकील श्री नागोशे यांचे मार्फत</u>**

२. हे म्हणणे खरे नाही की, जखमी हा विरुद्ध दिशेने येत होता. जखमी हा निलज कडून भिवापूरकडे येताना त्याच्या दिशेने येत होता. हे म्हणणे खरे नाही की, जखमी हा त्याच्या दिशेने येत होता हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळावर पक्क्या रस्त्यापासून बाजूला असलेला कच्चा रस्ता हा अर्धा फुट खाली आहे. नि.क्र. १३ वरील घटनास्थळ पंचनाम्यात घटनास्थळ उत्तर दिशेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, राकेश गेडाम हा माझा नेहमीचा साक्षीदार आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी पंचाना नोटीस दिला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी पंचासमक्ष घटनास्थळ पंचनामा तयार केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी तहरीकरीता पत्र दिले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा चौकशी अहवाल तयार केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास संपला.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,
माझे समक्ष,

दिनांक ०७.१२.२०२४.

स्वा/-
( एस.जे. लाड )
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
भिवापूर.